या सचिवालयातील 'लिपिक-टंकलेखक' संवर्गातील कर्मचाऱ्यांना दरमहा ठोक भत्ता मंजूर करण्याबाबत...

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई**
**क्रमांक : ४३०१ / क-१,**
**दिनांक : १३ मार्च, २०२५**

**: : <u>ज्ञा प न</u> : :**

मा.विशेष मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार या सचिवालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गात कार्यरत (मुख्य टंकलेखक, गोपनीय लिपिक, रोखपाल, देयक लिपिक, लिपिक-टंकलेखक, मा.पीठासीन/ मा.उप पीठासीन अधिकारी व मा.विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/ विधानसभा) यांचे आस्थापनेवरील लिपिक-टंकलेखक) कर्मचाऱ्यांना दरमहा रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) इतका ठोक भत्ता माहे फेब्रुवारी, २०२४ पासून पुढील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

१) लिपिक-टंकलेखक संवर्गात इतर क्षेत्रिय कार्यालय/ जिल्हा/ विभाग येथून प्रतिनियुक्तीने आल्यास त्यांना सदर दरमहा ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

२) लिपिक-टंकलेखकास सहायक कक्ष अधिकारी पदावर स्थानिक/ नियमित/ तात्पुरती पदोन्नती मिळाल्यास त्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून सदर ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

३) लिपिक-टंकलेखकाच्या रजा खाती देय व अनुज्ञेय रजा शिल्लक असल्यास संबंधित रजा कालावधीसाठी त्याला सदर ठोक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) एका कॅलेंडर महिन्यात १५ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी असाधारण रजा असल्यास त्या महिन्यात लिपिक-टंकलेखकास सदर ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

५) निलंबन कालावधीसाठी सदर ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही. तथापि, भविष्यात निलंबन कालावधी नियमित केल्यास सदर ठोक भत्ता संबंधितास अनुज्ञेय होईल. (निलंबन कालावधी १५ दिवस किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी असल्यास व सदर निलंबन कालावधी नियमित न झाल्यास, संबंधितांस सदर ठोक भत्ता पूर्ण महिन्यासाठी अनुज्ञेय होणार नाही)

६) लिपिक-टंकलेखक हा विभागीय सहायक कक्ष अधिकारी परीक्षा उत्तीर्ण होऊन, त्याची सहायक कक्ष अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याच्या लगतच्या महिन्यापासून त्याला सदर ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

२/..

७) लिपिक-टंकलेखक संवर्गात सेवेत लागल्यापासून ज्या दिनांकास सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या तीन लाभांच्या योजनेनुसार १० वर्षांची नियमित सेवा पूर्ण होईल (वरिष्ठ वेतनश्रेणी लागू होईल) त्यानंतरच्या लगतच्या महिन्यापासून सदर ठोक भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

सदर ज्ञापन निर्गमित झाल्यानंतर उपरोक्त अ.क्र.१ ते ७ प्रकरणी लिपिक-टंकलेखकास ठोक भत्त्याचे अतिरिक्त प्रदान झाल्यास, त्याची वसूली करण्यात येईल.

सदरहू ज्ञापन वित्त विभाग, व्यय-४ अनौपचारीक संदर्भ नस्ती क्र.१७०७, दिनांक ११ मार्च, २०२५ व वित्त विभाग अनौपचारीक संदर्भ नस्ती क्र.२०३५, दिनांक १३ मार्च, २०२५ नुसार देण्यात आलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

**प्रतिलीपी,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) सचिव (१) (का), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
४) सचिव (२) (का), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) या सचिवालयातील सर्व कक्ष
८) संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)
९) निवडनस्ती